# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/ बाजार समिती/सभापती उपसभापती/निवड/१८०३/२०२१. दिनांक:- २० /०५/२०२१.

**निवडणूक प्राधान्य**

**वाचावे :-** १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ.
२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम २२.
३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समिती निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार).
४. या प्राधिकरणाकडील आदेश जा. क्र. २०१३/सन २०२०, दिनांक १७.०८.२०२०.
५. या प्राधिकरणाकडील आदेश जा. क्र. १४५३/सन २०२१, दिनांक २९.०४.२०२१.

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचवे क्रमांक ४ च्या आदेशानुसार कृषि उत्पन्न बाजार समितीतील सभापती व उपसभापती या पदांच्या निवडीकरीता बोलवण्यात येणाऱ्या सभांकरीता प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत संबंधीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांना आदेशीत केलेले आहे.

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचवे क्रमांक ५ च्या आदेशानुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निडणूका घेण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या ऐवजी संबंधीत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) म्हणून घोषित केलेले आहे. परिणामी जिल्हयातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समितीच्या समिती सदस्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका हया संबंधीत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांच्या मार्फत होणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदीनुसार बाजार समित्यांच्या निवडणूका सुरळीपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमातील तरतुदींशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

ज्या अर्थी, प्राधिकरण कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती व उपसभापती या पदाच्या निवडीकरीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण वाचावे क्रमांक ४ च्या आदेशात अंशत: बदल करुन कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती या पदांच्या निवडीकरीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

१. जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकांकरीता प्राधिकरणाने वाचावे क्र. ५ अन्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना जिल्हा निवडणूक अधिकारी (कृषि उत्पन्न बाजार समिती) म्हणून मान्यता दिलेली असल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती या पदांच्या निवडीकरीता त्यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृषि उत्पन्न बाजार समिती) म्हणून आवश्यक कार्यवाही विहीत कालमर्यादा विचारात घेऊन त्यांचे स्तरावर पूर्ण करावी.

Scanned with CamScanner

२. सभापती व उपसभापती सभेकरीता प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करतांना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी सहाय्यक निबंधकाच्या दर्जाहुन कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

26/05/2021

**(यशवंत गिरी)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. जिल्हाधिकारी (सर्व).
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
३. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व).

**प्रत माहितीस्तव :-**

मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

Scanned with CamScanner